नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/09/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

## बुटीबोरी येथील ढवळपेठ शिवारात सुरु असलेल्या अवैध मोहाफुल गावठी हातभट्टी दारूचे अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड

आज दिनांक 06/09/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक उपविभाग नागपूर हद्दीत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे बुटीबोरी हद्दीत ढवळपेठ शिवारात अवैधरित्या मोहाफुल हातभट्टी सुरू असल्याचे माहितीवरून ढवळपेठ शिवारात पारधी टोल्यावर धाड टाकली असता पारधी टोल्याचे मागील जंगलातील नाल्यात आरोपी नामे– आकाश वाघमारे रा. ढवळपेठ पारधी टोला याने मोहाफुल गुळचा सडवा साठवुन ठेवुन 1400 लिटर मोहाफुल रसायण (सडवा), 50 लिटर मोहाफुल गावठी दारू व मोहाफुल दारू गाळण्याचे साहित्य असा एकुण 1,51,500/– रू चा मुद्देमाल मिळुन आला आहे. सर्व मुद्देमाल ताब्यात घेवुन आरोपीविरूध्द पोस्टे बुटीबोरी येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे बुटीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, महेश जाधव, नापोशि रामा आडे, पोलीस शिपाई अमृत किनगे, बालाजी साखरे, चालक सफौ साहेबराव बहाडे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर